# संकलित मूल्यमापन -2 (2022-23)

**शाळेचे नाव :**

इयत्ता: 7 वी गुण : 30

विषय : मराठी वेळ : 90 मिनिटे

---

**प्र. I सूचनेप्रमाणे लिहा.**

**1) खालील यमकयुक्त शब्दांपैकी गटात न बसणारा शब्द ओळखून लिहा.** **(1X2=2)**

a) सारी, भरारी, उभारी, काजवा

b) चंदेरी, गाणी, भलरी, रुपेरी

**2) खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा..** **(1X4=4)**

अ) पत्राचे प्रकार किती आहेत?

आ) सगळीकडे आहे. जाणवते, पण दिसत नाही. ओळखा कोण?

इ) तुकारामांनी आपल्या अभंगात देहाचे भोजन कोणते म्हटले आहे?

ई) दोन यमकयुक्त शब्दांच्या जोड्या लिहा.

**3) रेखांकित शब्दाच्या जागी योग्य शब्द घेवून म्हण ओळखा..** **(1X2=2)**

अ) उतावळा नवरा काखेत बाशिंग.

आ) कोल्ह्याला आवळा आंबट.

**5) वाकप्रचार व त्यांच्या अर्थाच्या जोड्या जुळवा.** **(1X4=4)**

| अ) | ब) |
|---|---|
| a) कान फुंकणे | अ) भांडण वाढविणे |
| b) विडा उचलणे | आ) नापसंती दर्शविणे |
| c) आगीत तेल ओतणे | इ) चहाडी चुगली करणे |
| d) नाक मुरडणे | ई) प्रतिज्ञा करणे |

**प्र. II खालील प्रश्नांची दोन ते तीन वाक्यात उत्तरे लिहा.** **(2X6=12)**

1) खालील ओळींना योग्य यमकयुक्त शब्द लिहा.

दुरून येतो झुळझुळ ..................

क्षणात हलवितो गवत ...............

2) खालील शब्द वापरून छोटी गोष्ट तयार करा.

दोन मित्र, जंगल, अस्वल, पळणे, पडून राहणे, वास घेणे, पुढे जाणे, खरा मित्र

3) बहिणीच्या लग्नामुळे तुम्ही चार दिवस शाळेत अनुपस्थित राहणार आहात. त्यासाठी वर्गशिक्षकांना सुट्टीसाठी अर्ज लिहा.

4) पहिला पाऊस आणि झाड एकमेकाशी बोलत आहेत अशी कल्पना करून त्यांच्यातील संवाद चार ओळीत लिहा.

5) 'असतील शिते तर जमतील भुते' या म्हणीचा अर्थ काय?

6) '0' चे महत्व तुमच्या शब्दात लिहा.

**प्र. III खालील प्रश्नांची चार पाच वाक्यात उत्तरे लिहा. (3X2=6)**

1) खालील कविता वाचून सारांश लिहा.

सुमनात तू गगनात तू
ताऱ्यांमध्ये फुलतोस तू ।
सद्धर्म जे जगतांमध्ये
सर्वात त्या वसतोस तू ॥
चोहीकडे रूपे तुझी
जाणीव ही माझ्या मना ॥

2) संवाद वाचून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

आई – अरे, मोहन काय शोधतोय?

मोहन – माझं दप्तर शोधतोय

आई – यावेळी दप्तर घेऊन तू काय अभ्यास करणार आहेस?

मोहन – अगं, दप्तरात माझा चेंडू आहे.

प्रश्न – अ) मोहन काय शोधत होता?

आ) हा संवाद कोणकोणामध्ये झाला आहे?

इ) मोहन दप्तरात काय शोधत होता?